महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे    Rs.2/-    कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरूवार ■ 13 फेब्रुवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 229 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# दुर्गाडी प्रमाणेच मलंगगडाचाही निकाल
## -उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विश्वास

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : ज्याप्रमाणे दुर्गाडी किल्ल्याचा निकाल न्यायालयातून मिळाला, तसाच निकाल मलंगडासाठीही मिळेल अशी आशा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. बुधवारी अंबरनाथ तालुक्यातील मलंगगडावर माघ पौर्णिमेनिमित्त दरवर्षी होणाऱ्या आरतीसाठी शिंदे उपस्थित होते. यावेळी बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले.

अंबरनाथ तालुक्यातील मलंगगड हे शिवसेनेच्या राजकीय वाटचालीसाठी महत्त्वाचे ठरले आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांनी मलंग मुक्तीचा नारा दिला होता. त्यानंतर दरवर्षी माघ पौर्णिमेला शिवसेनेचे वतीने येथे आरती केली जाते.



गडावरील स्थान मत्स्यंद्रनाथाचे स्थान आहे असा दावा शिवसेनेकडून केला जातो. मात्र हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे. दरवर्षी शिवसेनेचे नेते आणि पदाधिकारी गडावर येऊन आरती करतात.

यंदाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मलंग गडावर येऊन आरती केली तसेच यावेळी उपस्थित यांची संवाद साधताना मलंग गड मुक्त होईल, अशी आशा व्यक्त केली. काही दिवसांपूर्वी दुर्गाडी येथील जागेचा वाद न्यायालयाने निकाल देत सोडवला त्याच निकालाचा दाखला देत हा निकालही न्यायालयातून दुर्गाडी प्रमाणे लागेल अशी आशा शिंदे यांनी व्यक्त केली. तर आनंद दिघे यांनी सुरू केलेली सगळी आंदोलनं, उपक्रम, कार्यक्रम आजही जसेच्या तसे सुरू आहेत. कारण हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचाराने प्रेरित झालेले आम्ही शिवसैनिक आहोत. मी कुठेही असलो तरी दरवर्षी न चुकता मलंगगड यात्रेला येतो. धर्मवीर दिघे साहेब न थकता, न थांबता मलंगगडावर जायचे, ती आठवण आजही माझ्या मनामध्ये असल्याचे मत यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केले.

# खासगी सचिवांच्या नियुक्त्या रखडल्या



## नव्याने सादर होणार प्रस्ताव

**मंत्री कार्यालयातील खासगी सचिव, स्वीय सहाय्यक आणि विशेष कार्य अधिकारी यांच्या नियुक्त्या मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेने करण्याचे आदेश काढण्यात आले आहेत.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मंत्र्यांचे खासगी सचिव, स्वीय सहाय्यक आणि विशेष कार्य अधिकारी यांच्या नियुक्त्यांच्या अनेक प्रस्तावांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून अद्याप मान्यता न मिळाल्याने अनेक मंत्री नाराज आहेत. मुख्यमंत्र्यांनी अनेक नावांवर फुली मारल्याने नव्याने प्रस्ताव पाठविण्यात येत आहेत. त्यामुळे काही मंत्र्यांनी फडणवीस यांची भेट घेऊन प्रस्तावांना लवकरात लवकर मान्यता देण्याची विनंती केल्याचे समजते. मान्यता नसलेल्या अनेक कर्मचाऱ्यांनी मंत्री कार्यालयात आधीच काम सुरू केले असून, वेळ पडल्यास मंत्र्यांच्या मंजुरीने उसनवारीवर त्यांच्या नियुक्त्या केल्या जाणार आहेत.

मंत्री कार्यालयातील खासगी सचिव, स्वीय सहाय्यक आणि विशेष कार्य अधिकारी यांच्या नियुक्त्या मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेने करण्याचे आदेश काढण्यात आले आहेत. त्यानुसार प्रत्येक मंत्री कार्यालयात किमान एक खासगी सचिव आणि अन्य तीन कर्मचारी अशा ३९ मंत्र्यांच्या किमान १५६ कर्मचाऱ्यांच्या आणि दोन्ही उपमुख्यमंत्री कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांचे प्रस्ताव मुख्यमंत्री कार्यालयाकडे पाठविण्यात आले होते. मात्र अनेक नावांवर मुख्यमंत्री कार्यालयाकडून आक्षेप घेत त्यांच्या नियुक्त्यांना नकार देण्यात आला.

शासकीय कर्मचारी असल्यास त्यांचे गोपनीय अहवाल, त्याच्याबाबत भ्रष्टाचाराच्या किंवा अन्य तक्रारी, खासगी व्यक्ती असल्यास पोलीस अहवाल व अन्य पार्श्वभूमी, शिक्षण आदी तपशील तपासण्यात आला. या कठोर निकषांमुळे अनेक नावांवर फुली मारण्यात आल्याने संबंधित मंत्र्यांकडून नवीन नावांचे प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत. आतापर्यंत मंत्री कार्यालयातील ९० नियुक्त्यांना मान्यता देण्यात आल्याचे उच्चपदस्थ सूत्रांनी 'लोकसत्ता'ला सांगितले.

कर्मचारी नियुक्त्यांना मंजुरी नसल्याने जुन्या मंत्र्यांनी आधीचेच अनेक कर्मचारी कायम ठेवले आहेत. जर त्यांच्या नियुक्त्यांना मान्यता मिळाली नाही, तर उसनवारीच्या माध्यमातून त्यांना मंत्री कार्यालयात ठेवले जाईल आणि मूळ खात्यातून त्यांना पगार मिळेल, अशी व्यवस्था करण्यात आली आहे. उसनवारीची पद्धत सुरू असल्याने मंत्र्यांच्या मंजुरीने संबंधित कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या पुढील काळात आवश्यकतेनुसार होतील, असे सूत्रांनी स्पष्ट केले.

## थोडक्यात महत्वाचे

### नव्या आर्थिक वर्षापासून वीज दरात कपात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

केंद्रीय अर्थमंत्र्यांनी संसदेत देशाचा अर्थसंकल्प मांडला आणि या अर्थसंकल्पातून सामान्य नागरिकांना मोठा दिलासा देण्याचा निर्णय घेण्यात आला. ज्यानंतर आता सामान्यांना आणखी एक दिलासा मिळण्याची चिन्हं दिसत आहेत आणि यामागं कारण ठरेल ते म्हणजे वीजदरातील कपात. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी अर्थात महावितरणने पहिल्यांदाच घरगुती वीजदर कमी करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. यामुळं राज्यातील नागरिकांना लवकरच वीज कमी दरात मोठा दिलासा मिळणार हे जवळपास निश्चित दिसत आहे. महावितरणं दिवसा वीज वापरणाऱ्या ग्राहकांना अधिक सवलत देण्याचा प्रस्ताव मांडला असून, नव्या आर्थिक वर्षात म्हणजेच एप्रिल 2025 पासून लागू होणार असल्याचं म्हटलं जात आहे. राज्यात सौर ऊर्जा उत्पादनाला प्रोत्साहन देण्यात येत असल्यामुळे वीजबिलातील ही घट शक्य होत असून सामान्यांना या प्रस्ताव आणि निर्मयाचा फायदा होताना दिसणार आहे. महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार, एप्रिल महिन्यापासून वीज दरात प्रति युनिट 80 पैसे ते 1 रुपया इतकी कपात होऊ शकते. ऐन उन्हाळ्याच्या दिवसांतच ही प्राथमिक घट होत असल्यामुळं यंदा वीजबिल नागरिकांना घाम फोडणार नाही असंच म्हणावं लागेल.

### काँग्रेस अध्यक्षपदासाठी चार दिग्गजांची नावे चर्चेत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : काँग्रेसला राज्यात आता नवा कॅप्टन मिळणार असून याच आठवड्यात नव्या प्रदेशाध्यक्षपदाची घोषणा होण्याची शक्यता आहे. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्याशी या संदर्भात बोलणं झालं असून प्रदेशाध्यक्षपदाचा तिढा याच आठवड्यात सुटेल, असा विश्वास नाना पटोले यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला होता. त्यानुसार, आता दिल्लीत महाराष्ट्राच्या काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदाच्या हालचाली गतीमान झाल्या आहेत. त्यामध्ये, कोल्हापुरातील नेते व माजी मंत्री सतेज बंटी पाटील, लातूरमधील नेते आणि माजी मंत्री अमित देशमुख यांच्या नावाची चर्चा होत आहे. तर, माजी मंत्री व युथ काँग्रेसचे अध्यक्ष राहिलेल्या आमदार विश्वजीत कदम यांचेही नाव आघाडीवर आहे. मात्र, या तीन नावांसह सरप्राईजींग नाव म्हणजे बुलढाण्यातील काँग्रेस नेते हर्षवर्धन सपकाळ यांचं आहे. हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे राज्यातील काँग्रेसची धुरा देऊन आदिवासी समाजाला नेतृत्व देण्याचा प्रयत्नही काँग्रेसच्या विचाराधीन आहे. नाना पटोले यांच्यानंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदासाठी कोल्हापुरात पाटील तर लातुरातून देशमुख यांच्यात स्पर्धा पाहायला मिळत आहे. तसेच, विश्वजीत कदम यांचेही नाव समोर येत आहे. त्यामुळे, मराठवाडा आणि पश्चिम महारष्ट्रातील नेत्यांपैकी कोणाच्या गळ्यात अध्यक्षपदाची माळ पडते की, विदर्भातील हर्षवर्धन सपकाळ यांना काँग्रेसकडून संधी मिळते, हे लवकरच स्पष्ट होईल.

#### मुरबाड नगरपंचायत माजी नगरसेवक
### संतोष कोळेकर यांचे निधन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

संतोष कोळेकर यांचे निधन मुरबाड नगरपंचायत माजी नगरसेवक व लोकमित्र सामाजिक कार्यकर्ता संतोष शंकर कोळेकर यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले, त्यांच्या निधनामुळे मुरबाड शहरांत दुःखा चे वातावरण निर्माण झाले होते. अंत्ययात्रेत मोठा जनसमुदाय सहभागी झाला होता.

# उल्हासनगर शासकीय रूग्णालयात प्राणवायू निर्मिती यंत्रणा कार्यान्वित

## रुग्णालयाचा 22 लाख खर्च वाचणार
### प्रतिदिन 6 हजार लीटर क्षमता

### रूग्णालय स्वयंपूर्ण इतरांनाही मदत

**या प्राणवायू प्रकल्पामुळे उल्हासनगरचे मध्यवर्ती रूग्णालय प्राणवायूच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाले आहे. तर येथून निर्मिती होणारा प्राणवायू इतर रूग्णालयांनाही आपातकालीन वेळेत देता येणे शक्य होणार आहे. त्यामुळे आयत्या वेळी रूग्णालयांना त्याचा फायदा होणार असल्याची माहिती डॉ. मनोहर बनसोडे यांनी दिली आहे.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : उल्हासनगरच्या शासकीय मध्यवर्ती रूग्णालयात स्वतःची प्राणवायू निर्मिती यंत्रणा सुरू करण्यात आली आहे. काही दिवसांपासून याचे काम सुरू होते. या यंत्रणेमुळे रूग्णालयात कधीही प्राणवायुचा तुटवडा जाणवणार नाही. तसेच वर्षाकाठी येणारा सुमारे २२ लाखांचा खर्चही वाचणार आहे. या केंद्राची प्राणवायू निर्मिती क्षमता ६ हजार लीटर प्रतिदिन असून त्यामुळे बाहेर कोणत्या रूग्णालयाला आवश्यकता असल्यास त्यांना प्राणवायू उपलब्ध करून देता येणार आहे.

करोना काळात दुसऱ्या लाटेत अत्यावश्यक असलेला प्राणवायू मिळवण्यासाठी यंत्रणा, रूग्णालये आणि लोकप्रतिनिधींनी मोठी धावपळ करावी लागल्याचे दिसून आले होते. अनेक ठिकाणी प्राणवायूचे टँकर आपल्या रूग्णालयाकडे वळवून घेतल्याचे प्रकारही समोर आले होते. अनेक प्राणवायू निर्मिती कंपन्यांमध्ये थेट लोकप्रतिनिधी जाऊन टँकर मिळवताना दिसत होते. त्यामुळे या टँकरचा प्रवास पोलीस सुरक्षेत करण्याची वेळ आली. त्यानंतर रूग्णालयांमध्येच प्राणवायू निर्मितीची यंत्रणा उभारण्यात आली. कल्याणजवळील सावद येथे भव्य कोविड उपचार केंद्र उभारण्यात आले होते. या



उभारण्यात आलेल्या कोविड उपचार केंद्रात प्राणवायू निर्मिती यंत्रणासुद्धा बसवण्यात आली होती. कालांतराने हे केंद्रात प्राणवायुची गरज संपली. त्यामुळे ही यंत्रणा उल्हासनगरच्या मध्यवर्ती रूग्णालयात स्थलांतरीत करण्यात आली होती, अशी माहिती उल्हासनगर शासकीय मध्यवर्ती रूग्णालयाचे प्रमुख डॉ. मनोहर बनसोडे यांनी दिली आहे. ती यंत्रणा आता पूर्ण क्षमतेने सुरू करण्यात आली आहे. येथे हवेतून प्राणवायू मिळवला जातो. दिवसाला २० मोठे सिलेंडर भरतील इतकी क्षमता या यंत्रणेची आहे असेही बनसोडे यांनी सांगितले आहे. या प्रकल्पामुळे उल्हासनगरच्या मध्यवर्ती रूग्णालयात यापुढे बाहेरून प्राणवायू सिंलेंडर आणण्याची गरज पडणार नाही. प्रतिदिन ६ हजार लीटर प्राणवायुची निर्मिती येथे होऊ शकते. त्यामुळे रूग्णालयात थेट वाहिनीद्वारे प्राणवायू देणे सोपे होणार आहे. या प्रकल्पामुळे रूग्णालयाचे वर्षाकाठी २२ लाख रूपये वाचणार असल्याची माहिती डॉ. बनसोडे यांनी दिली

# वाळूच्या शासकीय लिलावास प्रतिसाद

### जिल्ह्यातून १७ हजार ब्रास वाळूची शासकीय दरानुसार विक्री

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जिल्ह्यातील नदी आणि खाडीपात्रातून प्रशासनाच्या माध्यमातून वाळू उपसा करून त्याचा लिलाव करण्यात येतो. मात्र मागील गेल्या काही वर्षांपासून वाळू लिलावाचे गोंधळलेले धोरण, रेतीचा विक्रीचा चढा दर यांमुळे जिल्ह्यात वाळू लिलावाला शून्य प्रतिसाद मिळत होता. मात्र मागील तीन महिन्यांपासून जिल्ह्यात चार ठिकाणी अखेर रेती गट सक्रिय झाले असून येथून रेती विक्री केली जात आहे. शासनाच्या दरानुसार जिल्ह्यातून सुमारे १७ हजार ब्रास वाळूची विक्री करण्यात आली आहे. येत्या काळात बांधकाम व्यावसायिकांकडून अधिक उत्तम प्रतिसाद मिळेल अशी माहिती जिल्हा रेतीगट विभागाकडून देण्यात अली आहे.

राज्य शासनाच्या नियमानुसार सागरी किनारपट्टी विनयमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सोपा व्हावा त्यात कोणतंही अडथळा येऊ नये यासाठी जिल्ह्यातील नदी आणि खाडी पात्रातून स्थानिक जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून वाळू उपसा करून त्याचा लिलाव करण्यात येतो. यासाठी जिल्हा रेतीगट विभागामार्फत निविदा काढण्यात येतात.


# भिवंडी महानगरपालिकेच्या आयुक्तपदी अनमोल सागर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी: भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे नवनियुक्त आयुक्त श्री. अनमोल सागर, भा.प्र.से. यांनी आज दिनांक 12. 02.2025 रोजी सकाळी महानगरपालिका मुख्यालयात आयुक्त पदाचा पदभार स्विकारला.

या प्रसंगी मा. अतिरीक्त आयुक्त श्री. देविदास पवार, विठ्ठल डाके यांनी त्यांचे स्वागत केले. मा. आयुक्त महोदयांनी सर्व विभाग प्रमुख आणि नियंत्रण अधिकारी यांची बैठक घेतली. या बैठकीत मा. आयुक्त महोदयांनी प्रथम सर्व अधिकाऱ्यांचा परिचय करुन घेऊन तद्नंतर आपला परिचय दिला.

या वेळी आयुक्तांनी त्यांना यापुढे सर्वांनी मिळून काम करावयाचे असून, जनमानसात महानगरपालिकेची एक चांगली व सकारात्मक प्रतिमा तयार करण्याबाबत भाष्य केले. यापुढे प्रत्येक कर्मचारी/ अधिकाऱ्याने त्याच्या कामात शिस्त आणि प्रामाणिकपणा पाळलाच पाहिजे. तसेच, यापुढे करण्यात येणारे काम हे वेळेतच आणि गुणवत्तापुर्ण करणे



आवश्यक आहे. कोणत्याही कर्मचाऱ्याचा कामाच्या गुणवत्तेमधील जाणीवपुर्वक हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही अशा इशारा दिला. तसेच, महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढविणे आणि कर वसुली 100% करणे यावरच लक्ष केंद्रीत करण्याचे सूचित केले. कोणत्याही प्रकारे महानगरपालिकेच्या पैशाचा अपव्यय सहन केला जाणार नाही. विविध विभागात एखाद्या कामाबाबत जी संदिग्धता दिसुन येते, किंवा काम कोणी करावे याबाबत संभ्रम निर्माण होतो त्या सर्व गोष्टी दुरूस्त करुन त्यात एकसुत्रीपणा आणणे गरजेचे आहे. तसेच, त्यांनी असेही नमुद केले की, या पुढे आपले नियमीत कामासोबतच प्रत्येक विभागाने एक नाविन्यपुर्ण प्रकल्प सादर करावा. त्यावर विचार विनीमय करुन ते काम पुर्णत्वास नेले जाईल. तसेच, माझ्या कामाची पद्धत म्हणजे मी जे काम सोपवितो त्याचा सातत्याने काम पुर्ण होईपर्यंत पाठपुरावा करतो. प्रत्येक विभागाने त्यांचे विभागाचे तातडीचे प्रश्न, दिर्घकालीन प्रश्न काही असतील तर ते सादर करावे. त्यावर मार्ग काढून त्यांचे निराकरण केले जाईल. तसेच, प्रत्येक विभागाने काही चांगले काम केले असल्यास, अथवा प्रस्तावित असल्यास ते तातडीने निदर्शनास आणावे अशा सूचना देखील दिल्या आहेत.

मात्र जे अधिकारी जाणीवपुर्वक एखादे काम करण्यास टाळाटाळ करीत असतील त्यांना मात्र कोणत्याही प्रकारे क्षमा केली जाणार नाही असा इशारादेखील त्यांनी दिला. जे अधिकारी चांगले काम करतील त्यांना प्रोत्साहन देणे, त्यांचा गौरव करणे आणि सदैव त्यांचा पाठीशी उभे रहाण्याची ग्वाही आयुक्त श्री. अनमोल सागर यांनी दिली. तसेच, नागरीकांकरिता आयुक्त हे आठवड्याचे पाचही दिवस पुर्णवेळ उपलब्ध राहणार असल्याचे सांगितले.

## उच्च न्यायालयाचा आदेश
# कल्याण न्यायालयाचे स्थलांतर नाही

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वार्ताहर। कल्याणः कल्याण जिल्हा आणि सत्र न्यायालयाची इमारत ब्रिटिश कालीन काळातील १२७ वर्षापूर्वीची आहे. मात्र हे न्यायालय या ठिकाणहून स्थलांतरीत करण्याचे प्रयत्न केले जात होते. तसेच येथील मोक्याची जागा काही बांधकाम व्यावसायिकांनी गिळंकृत करण्याचा प्रयत्न केला होता. उच्च न्यायालयात अॅड. रमाकांत परांजपे यांनी भूमिका विषद करीत न्यायालय मूळ ठिकाणीच विकसित करण्यात यावे, असे विधान शासनाच्या वतीने




उच्च न्यायालयात नोंदविण्यात आल्याने कल्याणातील न्यायालय आहे त्याच ठिकाणी विकसित करण्यास उच्च न्यायालयाने होकार दिला आहे. कल्याण न्यायालयात २२ न्यायाधीश कार्यरत असून ५२ प्रस्तावित न्यायाधीश या ठिकाणी लवकरच रुजू होणार आहेत. मात्र या अडीच एकर न्यायालयाच्या जागेवर काही बांधकाम व्यावसायिकांकडून जागा ताब्यात घेऊन टॉवर उभारण्यासाठी प्रयत्न केले जात होते.

याबाबत स्टेशनपासून किमान पाच ते सात किलोमीटर अंतरावरील बारावे या ठिकाणी न्यायालय हलविण्याच्या हालचालींनी वेग धरला होता. त्यामुळे कल्याण मधील वकील संघटनेने उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल केली होती. वकिलांच्या पाठिंब्याकरता अनेक सामाजिक संस्थांनी पुढाकार घेतला होता. उच्च न्यायालयाने आहे त्या मूळ ठिकाणी न्यायालय ठेवण्याचे आदेश दिल्याने न्यायालय स्थलांतराच्या मुद्द्याला पूर्णविराम दिला गेला आहे. न्यायालय मूळ ठिकाणी ठेवण्याकरिता वकील संघटनेने उच्च न्यायालयात पिटीशियन दाखल करीत शासनाकडे या संदर्भात स्थलांतरीत न करण्याची मागणी केली होती, अशी माहिती वकील संघटनेचे अध्यक्ष प्रकाश जगताप यांनी दिली. गुरुवारी उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीशांनी शासनाचे म्हणणे नोंदवीत कल्याण जिल्हा आणि सत्र न्यायालय मूळ ठिकाणी ठेवण्याचे आदेश केले आहे. त्यांनी वकिलांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.

## गीतासार



श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला ।
समाधावचला बुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि ॥२- ५३॥

तऱ्हेतऱ्हेची वचने ऐकून विचलित झालेली तुझी बुद्धी जेव्हा परमात्म्यात अचलपणे स्थिर राहील, तेव्हा तू योगाला प्राप्त होशील म्हणजेच तुझा परमात्म्याशी नित्यसंयोग होईल. ॥ २-५३ ॥

अर्जुन उवाच
स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव ।
स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् ॥२- ५४॥

अर्जुने विचारले, हे केशवा, जो समाधीत परमात्म्याला प्राप्त झालेला आहे, अशा स्थिरबुद्धी पुरुषाचे लक्षण काय? तो स्थिरबुद्धी पुरुष कसा बोलतो, कसा बसतो, आणि कसा चालतो? ॥ २-५४ ॥

श्रीभगवानुवाच
प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् ।
आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ॥२- ५५॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, हे पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), ज्यावेळी हा पुरुष मनातील सर्व कामना पूर्णपणे टाकतो आणि आत्म्यानेच आत्म्याच्या ठिकाणी संतुष्ट राहातो, त्यावेळी त्याला स्थितप्रज्ञ म्हटले जाते. ॥ २-५५ ॥

दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः ।
वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते ॥२- ५६॥

दुःखदायक प्रसंगी ज्याच्या मनाला खेद वाटत नाही, सुखांच्या प्राप्तीविषयी ज्याला मुळीच इच्छा नाही, तसेच ज्याचे प्रीती, भय व क्रोध नाहीसे झाले आहेत, असा मुनी स्थिरबुद्धी म्हटला जातो. ॥ २-५६ ॥

## आरोग्य टिप्स

### छाती आणि मणक्यासाठी प्रभावी योगासने

**मार्जरी आसन**

हे आसन पाठीचा कणा लवचिक बनवण्यास आणि छाती उघडण्यास मदत करते. मार्जरी आसनाचा सराव करण्यासाठी, गुडघे आणि तळहातांच्या मदतीने जमिनीवर या. आता एक दीर्घ श्वास घ्या आणि तुमची छाती वर उचला. नंतर, श्वास सोडा आणि पाठीचा कणा वरच्या दिशेने वाकवा आणि डोके खाली करा. ही प्रक्रिया 5-10 वेळा पुन्हा करा.

**धनुरासन**

हे योगासन छाती आणि पाठीचा कणा मजबूत आणि लवचिक बनवण्यास मदत करते. धनुरासनाचा सराव करण्यासाठी, पोटावर झोपा, दोन्ही पाय वाकवा आणि घोटे हातांनी धरा. दीर्घ श्वास घ्या आणि तुमची छाती आणि पाय वर उचला . या स्थितीत 15-20 सेकंद रहा. हे आसन छाती उघडण्यास आणि श्वास घेण्याची क्षमता वाढविण्यास मदत करते. पाठीचा कणा मजबूत आणि लवचिक बनवते.

**भुजंगासन**

भुजंगासन छाती उघडण्यासाठी आणि पाठीचा कणा मजबूत करण्यासाठी खूप फायदेशीर आहे. या आसनामुळे मणक्याची लवचिकता वाढते आणि छाती रुंद होते. श्वसनाच्या समस्यांमध्ये आराम मिळतो. पोटावर झोपा आणि तुमचे हात खांद्यांजवळ ठेवा. एक दीर्घ श्वास घ्या आणि तुमची छाती आणि डोके वर करा. खांदे मागे खेचा आणि मान सरळ करा. या स्थितीत 15-30 सेकंद रहा आणि हळूहळू परत या.

### इंडियन स्पोर्ट असोसिएशन आय एस ए नॅशनल गेम्स मध्ये

## जीवनदीप महाविद्यालयाच्या वेदांत सोनावळेचे यश



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

इंडियन स्पोर्ट असोसिएशन आय एस ए नॅशनल गेम्स मध्ये सहभागी होऊन जीवन दीपचा विद्यार्थी वेदांत संजय सोनावळे याने घवघवीत यश संपादन केला आहे. त्यामध्ये त्यांनी 100 मीटर रनिंग स्पर्धेत सुवर्णपदक 200 मीटर रनिंग स्पर्धेत सुवर्णपदक लांब उडी मध्ये रौप्य पदक तसेच कबड्डी मध्ये प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक मिळवले. त्याच्या या यशामुळे जीवनदीप संस्थेचे नाव पुन्हा एकदा उंचावले आहे. महाविद्यालयातून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे त्याच्या या योगदानाबद्दल क संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे संचालक प्रशांत घोडवींदे प्राचार्य डॉ के.बी कोरे उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे क्रीडा विभाग प्रमुख प्रा.मोहनीश देशमुख, प्रा. महेश थोरात यांनी त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## डोंबिवलीत श्रीमद्भागवत पारायण सप्ताह

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : लेवा पाटीदार समाज मंडळ आणि ज्येष्ठ नागरिक संस्थेच्यावतीने डोंबिवलीत श्रीमद्भागवत सप्ताह पारायण संगीतमय सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या 17 ते 23 फेब्रुवारी दरम्यान दत्तनगर येथील लेवा भवनात दुपारी 2 ते 5 दरम्यान हा सोहळा संपन्न होणार आहे.

लेवा समाजाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या या भागवत सप्ताहामध्ये कथा कथन चंद्रकांत महेंद्रकर महाराज, तर संहिता वाचन यशोदानंदन दास महाराज करणार आहेत. सोमवारी 17 फेब्रुवारी रोजी सकाळी 11 ते 1 या वेळेत विठ्ठल मंदिरातून ग्रंथ दिंडी, 18 तारखेला गीता पारायण गोविंदानंद सरस्वती न्यास, 19 तारखेला राधेकृष्ण भजनी मंडळाचे श्री विष्णू सहस्त्रनाम, 20 तारखेला कृष्ण जन्म सोहळा, 21 तारखेला 56 भोग गोवर्धन पूजा, 22 तारखेला श्रीकृष्ण-रुक्मिणी लग्न सोहळा, तर 23 तारखेला श्रीकृष्ण-सुदामा भेट दिंडी सोहळ्यासह हभप पराग महाराज चोपडे-भालोदकर यांचे काल्याचे किर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक दिगंबर पाटील, बाळू नेहेते, सुभाष राणे, अनिल महाजन, संजय झांबरे, सुरेश नेमाडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले आहे.

### आवक वाढली

## मिरचीच्या दरात घट



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा : मिरचीचे उत्पादन वाढत असल्यामुळे आवक वाढली आहे. त्यामुळे बाजारात मिरचीचा भाव उतरण्यास सुरुवात झाली आहे. कोणत्याही प्रकारची मिरची केवळ १५० रुपये किलो दराने मिळत आहे. मिरचीचे भाव याहून खाली उतरण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे. तेलंगणा राज्यात मिरचीचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. मागील वर्षी याच सुमारास चांगल्या दर्जाच्या मिरचीचा भाव सुमारे २६० रुपये किलोपर्यंत पोहोचला होता. वाडा तालुक्यात मिरची हा आहारातील अविभाज्य भाग बनला आहे. वाड्याच्या बाजारात प्रामुख्याने मालेवाडा, केसुरी, बुलेट, झिंगा, तेजा, आर मोर, शिव-५ या प्रकारच्या मिरचीला सर्वाधिक पसंती असते. सध्या सर्वच प्रकारची मिरची १५० रुपये किलो दराने विकली जात आहे. तेवढाच दर बाजारातही असल्याने नागरिक 15 of 18 गावातच मिरचीची खरेदी करीत आहेत. मागील वर्षी मिरची पिकाला चांगला भाव मिळाला होता. त्यामुळे तेलंगणा राज्यातील शेतकरी मिरची पिकाकडे वळले. परिणामी मिरची पिकाचे उत्पादन वाढले आहे. बाजारात मिरची पिकाची आवक वाढल्याने भाव उतरले आहेत.

## स्फूर्ती फाउंडेशन तर्फे मोफत स्मार्ट मतदान कार्ड शिबीर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : नागरीकांच्या सततच्या मागणीनुसार व दैनंदिन जीवनात महत्त्वाच्या अशा कागदपत्रा पैकी एक मतदान कार्ड परंतु बहूसंख्य नागरीकांकडे स्मार्ट मतदान कार्ड उपलब्ध नाही अशा नागरीकांसाठी स्फूर्ती फाउंडेशन माध्यमातून मोफत स्मार्ट मतदान कार्ड शिबिर आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये नागरीकांना जुने मतदान कार्ड,मतदान ओळखपत्र क्रमांक, आधार कार्ड, फोटो, मोबाईल नंबर इत्यादी कागदपत्रे सादर करून स्मार्ट मतदान कार्ड साठी नोंदणी करण्यात येईल. हे शिबीर दि.११ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी शंखेश्वर प्रेसिडेन्सी,शॉप नं १६,आर टि.ओ जवळ ,टावरी पाडा, कल्याण प.येथे सकाळी १० ते २ या वेळेत असेल. तरी नागरीकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन स्फूर्ती फाउंडेशन अध्यक्ष बजरंग तांगडकर, महिला प्रमुख शिल्पा तांगडकर, मार्गदर्शक, जेष्ठ पत्रकार शिवचरित्र व्याख्याते शांताराम तांगडकर यांनी केले आहे.

## केडीएमसीच्या ग आणि फ प्रभागातील मालमत्ता सील



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : डोंबिवली (पूर्व) ग प्रभाग क्षेत्रातील बिगर निवासी मालमत्तांना वारंवार भेटी व नोटीस देवूनसुध्दा मालमत्ता कराचा भरणा करीत नसल्यामुळे महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांचे निर्देशानुसार आणि कर निर्धारण व संकलन विभागाच्या स्वाती देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली ग प्रभागाचे सहा.आयुक्त संजयकुमार कुमावत, अधीक्षक ज्ञानेश्वर कंखरे, वरिष्ठ लिपिक नरेश म्हात्रे, लिपिक रामचंद्र दळवी यांनी थकबाकी पोटी बिगर निवासी मालमत्ता सिल करण्याची धडक कारवाई बुधवारी केली. यामध्ये डोंबिवली (पूर्व) मानपाडा रोड कस्तुरी प्लाझा येथील मालमत्ता क्र.G01001703500 यांच्या रक्कम रु. 20 लाख 58 हजार 191 इतक्या थकबाकी पोटी शितल ॲकेडमी व सोहम क्लासेस सिल करण्यात आले.

तर फ प्रभागात सहा. आयुक्त हेमा मुंबरकर, अधीक्षक महेश पाटील यांच्या पथकाने श्रीजी पॅलेस मधील सदनिका क्रमांक 501, मालमत्ता क्रमांक F01014490700 ही रक्कम रु. 1 लाख 55 हजार 266 इतक्या थकबाकीपोटी सिल केली. तसेच ओरिएंट सोसायटी येथील सदनिका क्रमांक c /409, मालमत्ता क्रमांक F01001864500ही थकबाकी रक्कम रु. 1 लाख 397 इतक्या थकाबाकीपोटी सिल करण्यात आली.

# कॉपीची कुप्रथा

आपल्याकडे फेब्रुवारी मार्च हा परीक्षांचा काळ असतो. या महिन्यात परीक्षा पार पाडण्याची जणू परंपराच आहे. दहावी बारावी या बोर्डाच्या परीक्षा याच काळात असतात. इतकेच काय तर शिष्यवृत्ती, नवोदय, मंथन यासारख्या स्पर्धा परीक्षा देखील याच काळात होतात. बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते ११ मार्च दरम्यान असून दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च दरम्यान होणार आहे. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड असतो. विद्यार्थ्यांच्या जीवनाला कलाटणी देणाऱ्या या परीक्षा असतात. दरवर्षी लाखो विद्यार्थी या परीक्षेला बसतात. यावर्षीही लाखो विद्यार्थी दहावी बारावीची परीक्षा देणार आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी वर्षभर मन लावून अभ्यास केलाय ते विद्यार्थी या परीक्षांना बेधडकपणे सामोरे जातात मात्र ज्या विद्यार्थ्यांचा पुरेसा अभ्यास झाला नाही ते विद्यार्थी गैरमार्गाने ही परीक्षा उत्तीर्ण होण्याचा प्रयत्न करतात. त्यातीलच एक गैरमार्ग म्हणजे कॉपी. दरवर्षी हजारो विद्यार्थी कॉपी करताना आढळतात. काहींवर कारवाई होते तर काहींना समज देऊन सोडून दिले जाते मात्र कॉपीची ही किड मुळापासून उखडून टाकली जात नाही. कॉपी ही आपल्या शिक्षण व्यवस्थेला लागेलेली किड आहे. वर्षभर अभ्यास न करता परीक्षेच्या दिवशी कॉपी करून उत्तीर्ण होण्याकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. ही धोक्याची घंटा आहे म्हणूनच खुद्द पंतप्रधानांना देखील यात लक्ष घालावे लागले. मन की बात या आपल्या कार्यक्रमात पंतप्रधानांनी याच विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांना पंतप्रधानांनी कॉपी केल्याने आयुष्य घडवता येत नाही असा कानमंत्र दिला. कॉपी करून आपण एखादी परीक्षा उत्तीर्ण होऊ शकतो मात्र जीवनाच्या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी कॉपी नव्हे तर अपार मेहनतच करावी लागते. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर मेहनतीला पर्याय नाही असा संदेशही पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांना दिला मात्र विद्यार्थी पंतप्रधानांचा हा संदेश कितपत अंमलात आणतील याबाबत शंकाच आहे कारण कॉपीची कुप्रथा कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. दहावी बारावीच्या परीक्षेत तर कॉपीचा सुळसुळाट झालेला दिसून येतो. वर्षभर अभ्यास न करणारे विद्यार्थी कॉपीच्या या कुप्रथेचे आवर्जून पालन करतात. काही ठिकाणी तर काही शाळा आणि संस्था देखील निकाल चांगला लागावा म्हणून या कुप्रथेला प्रोत्साहन देतात. काही पालकही आपल्या पाल्यांना कॉपी पुरवण्यासाठी जीवाचे रान करतात. शाळेच्या, परीक्षा हॉल च्या बाहेर कॉपी पुरवण्यासाठी तोबा गर्दी उसळते. झेरॉक्स दुकानांवर देखील तेवढीच गर्दी असते. अर्थात परीक्षेत कॉपी होऊ नये म्हणून प्रशासन सर्वोतोपरी प्रयत्न करतात हे मान्यच करावे लागेल. राज्यात कॉपीमुक्त परीक्षा व्हावी यासाठी प्रशासनाकडून विविध प्रकारचे अभियान राबवले जाते. भरारी पथक हे त्यापैकीच एक अभियान. बोर्डाच्या परीक्षा सुरू असताना काही अधिकारी बोर्डाकडून नेमले जातात. हे अधिकारी परीक्षा केंद्रावर अचानक भेटी देऊन परीक्षा केंद्रावर धाक बसवतात. कॉपी करताना कोणी विद्यार्थी आढळला तर त्याच्यावर कारवाई केली जाते. त्यांचे थेट निलंबन केले जाते. पण कॉपी बहाद्दरांना तुरुंगात टाकण्याची तरतूद आपल्याकडील कायद्यात नाही मात्र देशातील काही राज्यात कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना थेट तुरुंगात पाठवण्याचा कायदा आहे. आपल्याकडे देखील आता कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना वचक बसावा आणि राज्यात कॉपीमुक्त परीक्षा व्हाव्यात यासाठी राज्यसरकार प्रयत्न करत आहे. त्यासाठी त्यांनी अनेक कठोर निर्णय घेतले आहेत. कॉपीमुक्त अभियानासाठी राज्यसरकार जे प्रयत्न करीत आहे ते स्वागतार्ह असले तरी कठोर कायदे करूनच कॉपिला आळा घालता येईल असे नाही तर कॉपी करू नये यासाठी विद्यार्थ्यांचे प्रबोधनही करायला हवे. कॉपी करणारा विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण होऊ शकतो मात्र जीवनाच्या परीक्षेत तो उत्तीर्ण होऊ शकत नाही. जीवनाच्या प्रत्येक पावलावर परीक्षा असतात . त्यात उत्तीर्ण होण्यासाठी कॉपी नव्हे तर कठोर मेहनतच घ्यावी लागते. कठोर मेहनतीशिवाय फळ मिळत नाही. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर कॉपिसारख्या कुप्रथेला मूठमाती द्यावीच लागेल.

- श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## वीजबिलाविषयी फसव्या संदेशांना बळी पडू नका



### नागरिकांना महावितरणचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याणः अनोळखी क्रमांकावरून वीजबिल भरण्यासंदर्भातील येणाऱ्या फसव्या संदेशाला बळी पडू नये आणि वीज ग्राहकांना लुटणाऱ्या सायबर स्कॅमरपासून सावध राहण्याचे आवाहन महावितरणने केले आहे. महावितरणचे संकेतस्थळ तसेच मोबाईल ॲपवर बनावट मेसेजद्वारे होणारी फसवणूक कशी रोखता येईल, याची विस्तृत माहिती उपलब्ध आहे. तुमचे वीज बिल अपडेट नसल्याच्या कारणावरून आज रात्री वीजपुरवठा खंडित करण्यात येणार आहे. याकरिता ताबडतोब सोबत दिलेल्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधावा, असे बनावट मेसेज नागरिकांना पाठविण्यात येत आहेत. एखाद्या ग्राहकाने संपर्क साधला तर वीज बिल भरण्यासाठी वैयक्तिक मोबाइल क्रमांकावरून ऑनलाइन पेमेंटसाठी बनावट लिंक पाठवून ग्राहकांना सॉफ्टवेअर डाउनलोड करण्यास सांगितले जाते. त्यास प्रतिसाद दिल्यास मोबाइल किंवा संगणक हॅक करून बँक खात्यातील रक्कम लंपास होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे वीजग्राहकांनी अशा बनावट मेसेजकडे पूर्णपणे दुर्लक्ष करावे, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे. महावितरण तुम्हाला कोणत्याही व्यक्तीशी संपर्क साधण्यास सांगत नाही. महावितरण केवळ VM-MSEDCL/VK-MSEDCL/AM-MSEDCL/JM-MSEDCL सारख्या SENDER ID वरून एसएमएस पाठवते आणि कोणत्याही वैयक्तिक मोबाइल क्रमांकावरून एसएमएस व व्हॉटस्ॲप मेसेज, इ-मेल पाठविण्यात येत नाहीत. (SENDER ID मधील पहिली २ अक्षरे ऑपरेटर आणि स्थान दर्शवितात जिथून संदेश पाठवला जात आहे आणि तो MSEDCLवर समाप्त होतो.) बिलाच्या पेमेंटसाठी लिंक किंवा कोणतेही सॉफ्टवेअर डाउनलोड करू नये. मेसेजमध्ये नमूद केलेल्या कोणत्याही वैयक्तिक मोबाइल क्रमांकावर संपर्क साधू नये. ऑनलाइन पेमेंट करताना कोणत्याही परिस्थितीत तुमचा मोबाइल किंवा डेस्कटॉप स्क्रीन किंवा तुम्हाला मिळालेला ओटीपी शेअर करू नका. ग्राहक जवळच्या सायबर पोलिस स्टेशनमध्ये तक्रार / एफआयआर नोंदवू शकतो किंवा राष्ट्रीय सायबर क्राइम पोर्टल https://cybercrime. gov.in वर किंवा १९३० या क्रमांकावरील नागरिक आर्थिक फसवणूक पोर्टलवर ऑनलाइन तक्रार नोंदवू शकतो. अधिक माहिती, प्रश्नांसाठी, ग्राहक १८००-२१२-३४३५ अथवा १८००-२३३-३४३५ या अधिकृत टोल फ्री नंबरवर संपर्क करू शकतात.

## बॅनरच्या वादातून रोकडे बंधूंना मारहाण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील सरळगाव येथे बॅनर लावण्याच्या वादातून १३ रोजी जानेवारी २०२५ रोजी वकील प्रफुल रोकडे व त्याचा भाऊ अक्षय रोकडे या दोघांना एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी बेदम मारहाण केली होती. या घटनेतील आरोपींना तत्काळ अटक करायाच्या मागणीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सेक्युलर) च्या वतीने २१ जानेवारीपासून सुरू करण्यात आलेले बेमुदत धरणे आंदोलन आजही सुरूच आहे. रोकडे बंध मारहाण प्रकरणी पोलिसांनी हल्लेखोर अक्षय घुडे, विष्णू मुद्दे, वैभव पुढे व इतर ५ ते ६ आरोपीविरोधात नवीन फौजदारी कायदा भारतीय न्याय संहिता, ट्रॉसिटी कायदा व महाराष्ट्र पोलीस अधिनियमांन्वये विविध कलमांतर्गत गुन्हा नोंदविला आहे. मात्र आरोपींना अटक करण्यात मुरबाड पोलिसांना अजून यश आलेले नाही. त्यामुळे पोलीस राजकीय दबावाखाली काम करत असल्याचा आरपीआयने केला आहे.

## मुरबाड तालुक्यात चोरांचा सुळसुळाट

### नढई गावातील महिलेचे मंगळसूत्र चोरलं



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड शहरातील चोरीच्या घटना जरि काही दिवस थांबल्या असल्या तरी चोरट्यांनी आपला मोर्चा ग्रामिण भागात वळविला असून दोन दिवसापूर्वी नढई गावातील शोभा बाळकृष्ण टोहके या दुकानार महिलेचे दोन तोळयाचे मंगलसूत्र चोरून गंडा घातल्याचि घटना समोर आली आहे. सदर दोन चोर हे वस्तू घेण्याच्या बहाण्याने मोटार सायकलने दुकानात आले होते. दुकानदार महिलेला एकाने सिगारेट देण्यामध्ये गुंतविले व दुसर्याने गळयातिल मंगलसूत्र हिसकावून मोटारसायकल वरून पोबारा केला. एकट्या महिलांना गाठून त्यांच्या कडिल सोन्याचे दागिने लंपास करणारि टोळी तालुक्यात गेले अनेक दिवस सक्रिय असून नागरिकांना गंडा घालत आहे.हे चोरटे नढई मध्ये येण्यापूर्वी भुवन मधील एका दुकानात गेले असल्याचे सि.सि.टिव्ही फुटेज मध्ये दिसत आहेत. परंतु तिथे काही त्यांना चोरि करता आली नाही. तालुक्याच्या ग्रामिण भागात आज पर्यंत अनेक छोट्या मोठ्या चोरीच्या घटना घडल्या असून यातिल एकही घटनेचा तपास लावण्यात मुरबाड पोलिसांना यश आले नसून चोरटे मात्र मोकाट फिरत आहेत. नव्याने रूजू झालेले मुरबाड पोलिस स्टेशनचे चाणाक्ष पोलीस निरीक्षक संदीप गिते यांच्याकडून या चोरट्यांचा बंदोबस्त करतील व नागरिकांना न्याय देतिल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## 'रेबीजमुक्त ठाणे' अभियान पुर्ण

### ११ हजार ५८२ श्वानांचे लसीकरण

ठाणे : शहरात २९ जानेवारी ते ४ फेब्रुवारी या कालावधीत 'रेबीजमुक्त ठाणे' अभियान राबवण्यात आले. या अभियाना अंतर्गत शहरातील ११ हजार ५८२ श्वानांचे लसीकरण करण्यात आले. ठाणे महापालिका आणि मिशन रेबीज यांच्या संयुक्त विद्यामाने हे अभियान राबविण्यात आले. या अभियानात अनेक पशुप्रेमी संघटनांचाही समावेश होता. मागील काही वर्षात भटक्या श्वानांच्या संख्येत वाढ झाली आहे.

सर्व शहरांमध्ये भटक्या श्वानांचे वाढते प्रमाण तसेच भटक्या श्वानांनी घेतलेल्या चाव्यामुळे होणारी रेबीजची लागण लक्षात घेऊन ठाणे महापालिका आणि मिशन रेबीज यांच्या वतीने रेबीजमुक्त ठाणे अभियान राबवण्यात आले. रेबीजच्या लागण झालेल्या श्वानाच्या चाव्यामुळे होणारे मृत्यूचे प्रमाण २०३० पर्यंत शुन्यावर यावे यासाठी शासनाकडून विविध उपक्रम राबविले जात आहेत. या उपक्रमांतर्गत विविध अभियान राबवून त्यामध्ये भटक्या श्वानांचे रेबीज लसीकरण केले जात आहे. मागीलवर्षी देखिल ठाणे महापालिकेच्यावतीने



हा उपक्रम राबविण्यात आला होता. यामध्ये ५ हजार श्वानांना लस देण्याची योजना आखण्यात आली होती.

मात्र, प्रत्यक्षात ७ हजार ४०९ भटक्या श्वानांचे रेबीजचे लसीकरण पार पडले. यंदाही ठाणे पालिका आणि विविध पशूप्रेमी संघटनांच्या सहाय्याने हे अभियान पुर्ण झाले. २९ जानेवारी ते ४ फेब्रुवारी या कालावधीत हा उपक्रम राबविला गेला. या अभियानाच्या माध्यमातून विभागाप्रमाणे शहरातील ११ हजार ५८२ भटक्या श्वानांचे रेबीज लसीकरण यशस्वीरित्या झाले.

ठाणे शहरात सुमारे ६० हजार भटके श्वान आहेत. यातील सात हजार श्वानांचे मागच्या वर्षी रेबीज लसीकरण पार पडले. त्याचबरोबर यंदा ११ हजार ५८२ श्वानांचे लसीकरण करण्यात आले. या उपक्रमा अंतर्गत लसीकरण करण्यासाठी २५ पथकांची नेमणुक करण्यात आली होती. प्रत्येक पथकात एक डॉक्टर सह तीन कर्मचाऱ्यांची समावेश होता. शहरातील नागरिक तसेच प्राणी मित्रांकडून श्वानांची विभागवार माहिती घेण्यात आली होती. त्यानुसार शहरातील ११ हजार ५८२ श्वानांचे रेबीज लसीकरण झाले असल्याचे, ठाणे महापालिकेच्या पशु वैद्यकीय अधिकारी डॉ. क्षमा शिरोडकर यांनी सांगितले.

# एकनाथ शिंदेंचा महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

दिल्लीत शरद पवारांच्या हस्ते एकनाथ शिंदे यांना महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं. यावेळी एकनाथ शिंदे आणि शरद पवार हे एकाच मंचावर होते. विधानसभा निवडणुकीच्या वेळी आरोप-प्रत्यारोपांचं राजकारण पाहण्यास मिळालं होतं. मात्र ते सगळं विसरुन आज हे दोन नेते दिल्लीत एकत्र आले. दिल्लीत सुरु असलेल्या साहित्य संमेलनात एकनाथ शिंदेंचा गौरव करण्यात आला. यावेळी शरद पवार हे राजकारणात गुगली टाकतात तेव्हा भल्याभल्यांची विकेट जाते पण त्यांनी मला कधी गुगली टाकली नाही असंही एकनाथ शिंदे म्हणाले.



महादजी शिंदे हे आभाळाएवढं व्यक्तिमत्व होतं. ते महाप्रतापी रणधुरंधर होते. आदर्श शासक होते, कुशल योद्धे होते आणि खऱ्या अर्थाने महानायक होते. पानिपतचं युद्ध इतकं भीषण होतं की मराठा साम्राज्याचा अस्त झाला अशी स्थिती तेव्हा निर्माण झाली होती. कुठेही आशेचा किरण नव्हता. अशा परिस्थितीत महादजी शिंदेंनी पराक्रम गाजवून दिल्ली जिंकली आणि भगवा फडकवला हा इतिहास आहे. १० फेब्रुवारीला म्हणजे कालच या पराक्रमाला २५४ वर्षे पूर्ण झाली असंही एकनाथ शिंदे म्हणाले. दरम्यान एकनाथ शिंदेंच्या कृतीने सगळ्यांची मनं तर जिंकली पण त्या कृतीने त्यांनी महाराष्ट्राचंही मन जिंकलं. एकनाथ शिंदे यांना 'महादजी शिंदे राष्ट्र गौरव' पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र सदनात या क्रार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं.

दरम्यान या कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीतानं झाली. शामिमा अख्तर यांनी महाराष्ट्र गीत गायलं. शामिमा अख्तर जेव्हा महाराष्ट्र गीत गात होत्या तेव्हा सर्वजण खालीच बसले होते. मात्र ही गोष्ट एकनाथ शिंदे यांच्या लक्षात येताच ते स्वत: उभे राहिले अन् त्यांनी इतरांना देखील उभं राहिला सांगितलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ही कृती छोटीशीच होती. पण या कृतीने त्यांच्या मनात असलेला महाराष्ट्राबाबतचा आदर दिसून आला अशी चर्चा दिल्लीत रंगली होती.

# नवी मुंबई महापालिकेचा थकबाकीदारांना दणका

## १२८ मालमत्तांवर जप्तीची कारवाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : मालमत्ताकराचे थकबाकीदार असलेल्या व्यक्ती, संस्था यांना आवाहन करूनही तसेच नोटीस बजावूनही त्यांच्यामार्फत प्रतिसाद न देणाऱ्या १२८ थकबाकीदारांवर नवी मुंबई महापालिकेने मालमत्ता जप्तीची कारवाई केली. यामधील ३० थकबाकीदारांनी नोटीस मिळाल्यानंतर आपली थकबाकी व मालमत्ताकर जमा केला असून त्यापोटी महानगरपालिकेकडे ७ कोटी ४८ लक्ष इतकी रक्कम जमा करण्यात आलेली आहे. पालिकेच्या मालमत्ता विभागाने केलेल्या कारवाईमध्ये अमेय को-ऑप.हौ.सोसायटीमधील ३ थकबाकीदारांनी थकीत मालमत्ताकर भरणा करणेबाबत बजावलेल्या नोटिशीकडे दुर्लक्ष केल्याने या तिन्ही मालमत्ता टाळे लावून सीलबंद करण्यात आल्या. महापालिका आयुक्तांच्या मार्गदर्शनानुसार १ लाखापेक्षा अधिक रक्कमेचे थकबाकीदार असणाऱ्या मोठ्या थकबाकीदारांची उतरत्या क्रमाने यादी तयार करण्यात आली होती. यामधील ८ हजार मोठ्या थकबाकीदारांना थकबाकी भरण्यासाठी ७ दिवसांची मुदत देऊन नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. या नोटीसांनाही प्रतिसाद न देणाऱ्या १२८ थकबाकीदारांवर मालमत्ता जप्तीची कारवाई करण्यात आल्याची माहिती मालमत्ता कर विभागाचे उपआयुक्त शरद पवार यांनी दिली.



**नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात मालमत्ता करामधूनच नागरी सुविधांची पूर्तता केली जात असल्याने प्रत्येकाने आपली करभरणा वेळेत व नियमित करावी तसेच थकबाकी असल्यास तीही वेळेत भरुन नवी मुंबई शहर विकासात आपला सहभाग दयावा.अन्यथा कारवाईला सामोरे जावेच लागेल.**

**- डॉ. कैलास शिंदे ,**
**आयुक्त नवी मुंबई महापालिका**

थकबाकीदारांच्या यादीनुसार यापुढील काळात थकबाकीदार सोसायट्यांची नळजोडणी खंडित करण्याची कारवाई सुरु करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे मालमत्ता जप्तीची कारवाई करूनही थकबाकी न भरता नोटीसीला प्रतिसाद न देणाऱ्या थकबाकीदारांच्या मालमत्तांचा लिलाव करण्याची कारवाई देखील सुरू करण्यात आली आहे.

# वसई विरार महापालिकेत उपायुक्तांची सात पदे रिक्त




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वसई- वसई विरार महापालिकेतील उपायुक्तांची १४ पैकी ७ पदे रिक्त असल्याने सध्या कार्यरत असलेल्या उपायुक्तांवर कामाचा ताण वाढत आहे. यामुळे उपायुक्तांकडे १२ ते १५ विभाग देण्यात आले आहेत.

२००९ साली शहरातील ४ नगरपरिषदा आणि ग्रामपंचायतींचे विलिनिकरण होऊन वसई विरार महापालिकेची स्थापना झाली होती. २०१४ साली पालिकेचा आकृतीबंध मंजूर झाला होता. त्यानुसार २ हजार ८५३ पदे मंजूर होती. त्यावेळी एकूण उपायुक्तांची १४ पदे मंजूर होती. उपायुक्तांची पदे प्रतिनियुक्तीवर भरण्यात येतात. परंतु सध्या केवळ ७ उपायुक्त कार्यरत आहेत. एक उपायुक्त वैद्यकीय रजेवर आहेत. त्यामुळे ७ उपायुक्तांवरच पालिकेचा कारभार चालविण्यात येत आहे. विभाग जास्त आणि उपायुक्त कमी असल्याने त्यांच्यावर अनेक विभागांची जबाबदारी देण्यात आली आहे. नानासाहेब कामठे आणि समीर भूमकर यांच्यावर प्रत्येकी १२ ते १५ विभाग सोपविण्यात आले आहेत.

**उपायुक्तांची पदे ही शासनाकडून प्रतिनियुक्तीवर भरली जातात. त्यासाठी आम्ही शासनाकडे पाठपुरावा करत आहोत.**

**- सदानंद पुरव**
**उपायुक्त (आस्थापना)**

जास्त विभाग असल्याने उपायुक्तांवर कामाचा प्रचंड ताण येत आहे. नियमित बैठका, शासकीय कार्यक्रम, वेगवेगळया विभागांचे उपक्रम, नागरिकांच्या भेटी, कार्यालयीन कामे यामुळे प्रत्येक विभागाला न्याय देता येत नाही, असे काही उपायुक्तांनी सांगितले.

# मिरा भाईंदर शहरात जलप्रदूषणाची समस्या बिकट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भाईंदर : मिरा भाईंदर शहरातील सांडपाण्याबर प्रक्रिया करणारे मलनि:सारण केंद्र हे संथ गतीने काम करत आहेत. त्यामुळे जलप्रदूषणाची समस्या कायम आहे. त्यासाठी या केंद्राचे शासनाच्या महाप्रीत (महात्मा फुले नवनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रायोगिक मर्यादित ) संस्थेमार्फत लेखा परीक्षण करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

मिरा भाईंदर शहरात विविध ठिकाणी एकूण १९ मलनि:सारण केंद्र (एसटीपी) आहेत. हे केंद्र जवळपास पंधरा वर्षापूर्वी उभे करण्यात आले आहेत. मात्र शहरात भूमिगत गटार योजनेचे काम बऱ्याच वर्षांपासून रखडलेले असल्यामुळे हे केंद्र अपेक्षे प्रमाणे कार्यरत नाही.परिणामी अनेकवेळा दूषित पाणी



प्रक्रियाविनाच खाडी पात्रात सोडण्यात येत आहे.त्यामुळे पाणी प्रदूषणात मोठी वाढ झाली असल्याचे आरोप पालिकेवर सातत्याने करण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर शहरातील मलनि:सारण केंद्राचे 'लेखापरीक्षण ' करून घेण्याचा निर्णय आयुक्त संजय काटकर यांनी घेतला आहे.यात समोर येणाऱ्या त्रुटींवर काम करून हे केंद्र पूर्ण क्षमतेने चालवण्याकडे प्रशासनाचे लक्ष असल्याचा दावा काटकर यांनी पत्रकार परिषदेत केला आहे.

# वाहतूक पोलिसाला लाच घेताना अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण वाहतूक विभाग शहाड चौकी अंतर्गत एका वाहतूक पोलिसाला टेम्पो न अडविण्यासाठी दरमहा 500रू लाच घेतल्याप्रकरणी तक्रार दाराच्या तक्रारी नुसार ठाणे लाचलुचपत विभागाने सापळा लावित रंगेहाथ पकडल्याने वाहतूक विभागात लाचखोरी चे ग्रहण लागले आहे असे दिसत आहे. प्राप्त माहिती नुसार ,तक्रारदाराचा ट्रॉंन्सपोर्टचा व्यवसाय असून त्यांचा महींद्रा बोलेरो पिकअप टेम्पोला कल्याण मध्ये माल वाहतूकी दरम्यान कोठेही न अडवण्या करीता दर महीना सातशे रु.लाच कल्याण वाहतूक विभागातील शहाड वाहतूक चौकीतील पोहवा प्रविण गोपाळे यांनी मागणी करुन, पैसे दिले नाही तर प्रत्येक चौकात गाडी अडवून कारवाई करणार असल्याबाबत सांगीतले होते.अशी तक्रार तक्रारदराने लाचलुचपत विभाग ठाणे यांच्या कडे दिली होती.

# नडगाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी शेवंता जाधव



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा/ नडगाव दानबाव ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंच शेवंता जाधव याची बिनविरोध निवड करण्यात आली आहे,तत्कालीन उपसरपंच नितीन घरत यांनी ठरल्याप्रमाणे राजीनामा दिला होता, त्या प्रमाणे शासनाच्या आदेशानुसार उपसरपंच पदाची निवडणूक घेण्यात आली,उपसरपंच पदा साठी शेवंता जाधव याचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने सभेचे अध्यक्ष तथा सरपंच प्रमिला प्रकाश भोईर यांनी उपसरपंच पदि शेवंता जाधव याची निवड केली यावेळी ग्रॉंमसेवक प्रसेन गोतारणे तसेच ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते,नवनिर्वाचित उपसरपंच यांना शुभेच्छा देण्यासाठी शिवसेना तालुका प्रमुख वसंत लोणे,माजी सरपंच आदेश चौधरी, प्रकाश लोणे,भानुदास घरत,सतीश चौधरी, संदिप चौधरी,आदी उपस्थित होते,यावेळी शिवसेना तालुका प्रमुख वसंत लोणे यांनी सांगितले की प्रथम ग्रामपंचायत सदस्य यांचे अभिनंदन करतो सवैजण एकत्र मिळुन विकासाची कामे करीत आहेत, सवौना संधी मिळाली पाहिजे त्या प्रमाणे सरपंच व उपसरपंच याची ठरल्याप्रमाणे निवड केली जाते खेळीमेळीच्या वातावरणात निवड करण्यात आली आहे असे सांगितले,

# राज्यातील बावीस शाळांचा अल्पसंख्यांक दर्जा काढला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्र अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी अकोल्यातील उर्दू शाळांवर धाड टाकली. संस्था चालक अत्याचार, मारहाण आणि जीवे मारण्याची धमकी देत असल्याचा आरोप महिला शिक्षिकांनी केला होता. त्यामुळे शाळांवर हे धाडसत्र सुरु आहे. पातूर येथील उर्दू शाळेतील महिला शिक्षकांचा लैंगिक छळ व गैरकारभार प्रकरणी शाळा संचालकावर कठोर कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच 22 शाळांचा अल्पसंख्यांक दर्जा काढून घेण्याचे निर्देशही अध्यक्ष प्यारे जिया खान यांनी दिले आहेत.

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान यांनी अकोला जिल्ह्यातील शासन अनुदानित उर्दू शाळांना भेटी दिल्या. या भेटीदरम्यान अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. अकोला जिल्ह्यातील पातुर येथे अलहाज सलीम जकरिया उर्दू वरिष्ठ प्राथमिक शाळेच्या संचालकाकडून महिला शिक्षकांना मारहाण व लैंगिक छळाच्या तक्रारी अल्पसंख्यांक आयोगाला प्राप्त झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर प्यारे खान यांनी या शाळांना भेटी देत वस्तुस्थिती जाणून घेतली. यावेळी त्यांच्यासोबत शिक्षणाधिकारी सुचिता पाटेकर व पोलीस उप अधिक्षक गजानन पडघन यांच्यासह अल्पसंख्यांक आयोगाचे अधिकारी उपस्थित होते. अकोल्याचे पोलीस अधिक्षक बच्चन सिंह यांनी अकोला विश्रामगृह येथे प्यारे खान यांनी भेट घेत वस्तुस्थिती जाणून घेतली.

पिडित महिला शिक्षकांनी प्यारे खान यांच्यासमोर शाळेचे संचालक सैय्यद कमरुद्दीन यांच्याविरोधात तक्रारींचा पाढा वाचला. शाळा संचालक सैय्यद कमरुद्दीन हे बंदुकीचा धाक दाखवून लैंगिक शोषण करत असल्याचा खळबळजनक आरोप यावेळी महिला शिक्षिकांनी केला. यावेळी त्यांनी प्यारे खान यांच्यासमोर पुरावे सादर



केले. शिक्षकांची नेमणूक करण्यासाठी 40 लाख रुपये रोख मागणे, नियुक्त झालेल्या शिक्षकांच्या पगारातून 30 ते 40 टक्के रक्कम जबरदस्तीने वसूल करणे अशा प्रकारच्या अनेक तक्रारी यावेळी शिक्षकांनी केल्या. सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांच्या सेवानिवृत्ती वेतनातूनही जबरदस्ती मोठी रक्कम वसूल केली जात असल्याच्या तक्रारी यावेळी अनेक सेवानिवृत्त शिक्षकांनी केल्या आहेत. शाळा संचालक कमरुद्दीन यांच्या विरोधात विविध 45 गंभीर गुन्हांची नोंद आहे. यात कलम 376 (बलात्कार) अशा स्वरुपाचे गंभीर गुन्हे देखील आहेत. शिवाय याच्याविरुद्ध हद्दपारची कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे मकोका व एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांना विनंती करणार असल्याचे प्यारे खान यांनी सांगितले. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी सध्या राज्यातील सरकार अनुदानित उर्दू शाळांच्या गैरकारभारा विरोधात धडक कारवाई सुरु केली आहे. राज्याभरातील सर्व जिल्ह्यांना भेटी देऊन ते अल्पसंख्यांक दर्जा असलेल्या शाळांच्या स्थितीचा आढावा घेत आहेत. आज प्यारे खान यांनी अकोला जिल्ह्यातील पातुरमधल्या उर्दू शाळांना भेटी दिल्या. अकोला जिल्ह्यातील पातूरचे संस्थाचालक सय्यद कमरोद्दीन यांच्या विविध शाळांसदर्भात जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात तक्रारी आल्या होत्या. जिल्हाभरात त्यांच्या 22 अनुदानित शाळा आहेत. या शाळांमध्ये सर्रासपणे शिक्षक आणि कर्मचाऱ्यांवर संस्थाचालकाकडून मारहाण आणि लैंगिक छळाच्या तक्रारी पुढे आल्या आहेत.

या संपूर्ण गंभीर प्रकरणात पोलीस कारवाई करण्याचे आदेश अल्पसंख्यांक आयोगाने अकोला पोलिसांना दिले आहेत. तर लवकरच चौकशी करून संबंधितांवर गुन्हे दाखल करणार असल्याचे पोलीस अधिक्षक बच्चन सिंह यांनी स्पष्ट केले आहे. राज्यातील उर्दू शाळांच्या माध्यमातून सरकारला हजारो कोटींचा चुना लावला जात असल्याचा आरोप प्यारे खान यांनी केला आहे. अल्पसंख्यांक समाजातील जागरुक नागरीक, स्वयंसेवी संस्था व पिडीत शिक्षकांनी अशा प्रकारच्या तक्रारी असल्यास राज्य अल्पसंख्यांक आयोगाकडे संपर्क साधावा असे आवाहन प्यारे जिया खान यांनी केले आहे.

# खडवली स्थानकातील पादचारी पुलाचे काम सुरू करा - प्रवाशांची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

खडवली : कल्याण कसारा मार्गावरील मध्य रेल्वेचे स्थानक असलेल्या खडवली या स्थानकातील मुंबई दिशेकडील पादचारी पुलामुळे दिव्यांग व्यक्तींबरोबरच वयोवृद्ध शाळकरी विद्यार्थी यांचे अतोनात हाल होत आहेत या पुलाची रचना बांधकाम दिशा चुकीच्या पद्धतीने असल्याने संबंधित व्यक्तींना चढ-उतार करताना मोठा त्रास सहन करावा लागतो या स्थानकातील पुलाचे काम युद्ध पातळीवर सुरू करावे अशी मागणी खडवली स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या कडून केली जात आहे.

सध्या रेल्वे मंत्रालयाकडून युद्धपातळीवर रेल्वे स्थानकांची कामे केली जात आहेत यामध्ये स्थानकांचे नूतनीकरण फलाटाची दुरुस्ती त्याचबरोबर स्थानकातील पादचारी पूल यांचीही कामे केली जात आहेत. परंतु कल्याण कसारा या मार्गावरील



रेल्वेचे स्थानक खडवली येथील असणारा पादचारी पूल गैर असल्याने प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करून पूर्व पश्चिम भागात ये जा करावी लागत आहे. त्यातच महत्वाची बाब हा पादचारी पूल त्रासदायक ठरत आहे. विशेष बाब म्हणजे या स्थानकाची रचना अशा पद्धतीची आहे की या पादचारी पुलावरूनच जाण्याशिवाय दुसरा मार्ग नाही, त्यास प्रमाणे पेक्षा उंचीवर असल्याने या पादचारी पुलावरून दिव्यांग व्यक्तींबरोबरच वयोवृद्ध व्यक्तींना प्रचंड मनस्ताप सहन करीत या स्थानकातील या पादचारी पुलाची पुनर्बांधणी लवकरात लवकर करावी अशी मागणी वयोवृद्ध व्यक्ती दिव्यांग व्यक्ती विद्यार्थी त्यांचे पालक व्यापारी वर्ग कामगार वर्ग या सर्वांसाठीच हा पूल गैरसोयीचा ठरत आहे. त्यातच या स्थानकातील पूर्व पश्चिम भागात वाहन चालक रिक्षा चालक बेशिस्तपणे पार्किंग करत असल्याने सकाळ संध्याकाळ वाहतुकीची कोंडी होते.

# संत रविदास महाराजांना भिवंडी महापालिकेतर्फे अभिवादन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी महानगरपालिका मा. प्रशासक तथा आयुक्त यांच्या निर्देशानुसार दि.१२/०२/२०२५ रोजी संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त गहानगरपालिका मुख्यालयातील तळमजल्यावरील सभागृहात भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या वतीने मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा.प्र.से) यांच्या शुभहस्ते संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम संपन्न झाला.

रैदास या नावाने प्रसिद्धः उत्तर भारतातील एक मध्ययुगीन संत. महाराष्ट्रात रोहिदास म्हणून ओळखले जाणारे संत हेच असावेत, असे दिसते. ते काशीचे राहणारे होते. त्यांच्या वडिलांचे नाव राहू, आईचे नाव करमा व पत्नीचे नाव लोना होते. त्यांना विजयदास नावाचा पुत्र असल्याचा उल्लेख परमानंदस्वामिरचित रविदास पुराणह्या ग्रंथात आढळतो. सत्संगतीचा परिणाम होऊन ते बाराव्या वर्षापासूनच राम व सीता यांच्या मूर्तीची पूजा करू लागले. रविदास यांची पदे ग्रंथसाहिबमध्ये आढळतात. त्यांच्या रचनाचा एकसंग्रह प्रयागहून 'रैदासजी की बानीया' प्रकाशित झाला आहे. संत रविदास हे संत कबीर यांचे समकालीन असल्याचा उल्लेख आढळतो. मीराबाईंनी आपल्या अनेक पदांतून रविदास हे आपले गुरु असल्याचे म्हटले आहे.

भक्तीसाठी परमवैराग्याची आवश्यकता आहे, असे ते मानत असत. अनिर्वचनीय, एकरस, अक्षर व अविनाशी असे परमतत्त्व हेच सत्य असून ते प्रत्येक जीवामध्ये अवस्थित असते, असा तत्त्वज्ञानविषयक विचार त्यांनी मांडला आहे. त्यांचे सदाचरण व आध्यात्मिक साधना पाहून सर्व वर्णाचे लोक आपला वर्णाहंकार विसरून त्यांच्यापुढे नम्र होत असत. ते १२० वर्षांवर जगले, असे मानले जाते. त्या वेळचे एक प्रसिद्ध महात्मा म्हणून कबीरांनीही (संतनिमें रविदास संत) त्यांना गौरविले. नाभादास, प्रियादास, धन्ना भगत, मीराबाई इ. संतांनीही त्यांचा आदरपूर्वक उल्लेख केला आहे.

त्यांनी प्रवर्तित केलेला पंथ-रैदासी पंथ म्हणून प्रसिद्ध होता. महाराष्ट्र, गुजरात, पंजाब, राजस्थान या प्रदेशांत या पंचाचे अनुयायी आढळतात अशा या थेस संतास महानगरपालिकेतर्फे अदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी मा. अति आयुक्त श्री. देविदास पवार, श्री. विठ्ठल डाके, उप-आयुक्त श्री. रोहिदास दोरकुळकर, श्री. बाळकृष्ण क्षिरसागर, डॉ. अनुराधा बाबर, सहा. आयुक्त सामान्य प्रशासन श्री. अजित महाडीक, सहा. आयुक्त (निवडणूक) श्री. नितिन पाटील, आरोग्य विभाग प्रमुख श्री. हरेश भंडारी, मुख्य अग्निशमन अधिकारी श्री. राजेश पवार, प्रभाग अधिकारी राजेद्र वरळीकर, बाळाराम जाधव, माणीक जाधव, सुरेद्र भोईर कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) श्री. संदिप पटनावर, डॉ. संदिप गाडेकर (MOH), श्री. नंदकुमार चौधरी अंतर्गत लेखापरिक्षक व मनपा कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रायगडमध्ये जागतिक इंटरनेट दिवस साजरा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड - राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (NIC) अलिबाग रायगडचे प्रमुख निलेश लांडगे यांच्या नेतृत्वाखाली, यांच्या मार्गदर्शनाखाली लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळाच्या विद्यालय व महाविद्यालयात जागतिक सुरक्षित इंटरनेट दिवस कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. जागतिक सुरक्षित इंटरनेट दिवसाच्या निमित्ताने रायगड जिल्हा स्तरावर विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाला NIC इंजिनियर निखिल पडते व विराज चांगे, विद्यालयाचे प्राचार्य, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. त्यांनी प्रभावी वक्तृत्व सादर करत सुरक्षित इंटरनेटच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. कार्यक्रमात श्री. निलेश लांडगे यांनी विद्यार्थ्यांना इंटरनेट सुरक्षिततेचे महत्त्व समजावून सांगितले. त्याचबरोबर निखिल पडते यांनी इंटरनेटच्या फायदे-तोटे तसेच सायबर सुरक्षेबाबत आवश्यक मार्गदर्शन दिले. उपस्थितांनी या चर्चेत सक्रिय सहभाग घेतला आणि इंटरनेट सुरक्षिततेविषयी अधिक जागरूक राहण्याचा संकल्प केला. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनामुळे विद्यार्थ्यांना सुरक्षित इंटरनेट वापराबद्दल महत्त्वपूर्ण माहिती मिळाली. कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

## संक्षिप्त

# कॉस्टिक सोडयात भेसळ

## टँकरचालकावर गुन्हा दाखल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगरः एका कंपनीतून दुसऱ्या कंपनीत कॉस्टिक सोडा घेऊन जाणाऱ्या टँकर चालकाने कॉस्टिक सोड्यात भेसळ केली. त्यामुळे कंपनीला १३ लाख ८२ हजार २९३ रुपयाचे नुकसान झाले. याप्रकरणी उल्हासनगर पोलीस ठाण्यात दोन टैंकर चालकांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. उल्हासनगर कॅम्प नं १ परिसरात बिजासनी वॉल्क कॅरिअर्स ट्रान्सपोर्टमधील दोन टँकरमधून आंध्रप्रदेश येथील ग्रासीम इंडस्ट्रियल लिमिटेड या कंपनीतील कॉस्टिक सोडा हा ओरिसा येथील नालको कंपनी येथे नेण्यात आला. मात्र ५ डिसेंबर २०२४ ते २९ जानेवारी २०२५ दरम्यान टैंकर चालक शिवकुमार यादव आणि मोहम्मद नूर आलम यांनी १ लाख २० हजार किंमतीचा कॉस्टिक सोडा टँकरमधून काढून त्याऐवजी दुसरा पदार्थ भेसळ केला. या भेसळीमुळे टैंकर मधील १३ लाख ८२ हजार २८३ रुपयाच्या कॉस्टिक सोड्याचे नुकसान झाले. याप्रकरणी बिजासनी ट्रान्सफॉर्टचे ट्रान्सफॉर्ट मॅनेजर रुपेश मिश्रा यांच्या तक्रारीवरून उल्हासनगर पोलीस ठाण्यात टैंकर चालकांवर गुन्हा दाखल झाला आहे.

# सिलेंडरच्या आगीने तरुणाचा मृत्यू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याणः टिटवाळा पश्चिम येथील गणराज को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीतील चाळीतील एका घरात घरगुती गॅस सिलिंडरची ७ फेब्रुवारी रोजी गळती झाली. या आगीत सतीश तवटे (३७) हे जबर जखमी झाले. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असताना रविवारी उशिरा त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पत्नीलाही या दुर्घटनेत दुखापत झाली. तसेच घरातील टीव्ही, फ्रीज, कपाट तसेच पत्रेही जळून खाक झाले. टिटवाळ्यातील ९० फूट रस्त्यालगत सोसायटीमधील चाळीत तवटे दांपत्य राहत होते. ७ फेब्रुवारीच्या रात्री साडेदहाच्या सुमारास गॅस सिलिंडरला गळती लागली. अचानक विद्युत प्रवाहाने पेट घेतल्याचे सांगितले जात आहे. आग लागल्याने घरातील इलेक्ट्रॉनिक वस्तू जळू लागल्या. आगीच्या भक्षस्थानी सतीश तवटे सापडले. त्यात ते ५० ते ६० टक्के भाजल्याने त्यांना डोंबिवली येथील खासगी रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले होते. मात्र रविवारी तवटे यांची प्राणज्योत मावळली.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) — कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) — कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) — कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी अ‍ॅण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# ठाण्याच्या विकास आराखडयावर आज सुनावणी होणार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /ठाणे: ठाणे शहराचा १९९९ नंतर तब्बल २० वर्षांनंतर सुधारित आराखडा तयार करण्यात येत आहे. या सुधारित विकास आराखड्यासंदर्भात पालिकेने सूचना व हरकती मागवल्या होत्या. शहर विकास आराखड्याबाबत हरकती व सूचना आल्या. मात्र सुनावणीच्या पहिल्या दिवशी काही कारणास्तव ती पुढे ढकलण्यात आली होती. ही सुनावणी तब्बल दहा दिवसांनी १३ फेब्रुवारीला सुरू होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. या आराखड्याच्या माध्यमातून ठाणे शहराची लोकसंख्या वाढत असतांना त्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी महापालिकेकडून प्रयत्न केले जात आहेत. वाहतूक कोंडी सोडवणे, शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी उच्च तंत्रशिक्षण, डिजिटल विद्यापीठ, वैद्यकीय शिक्षण, आरोग्य, इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्स आणि इतर सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. वॉटर फ्रण्ट, अर्बन फॉरेस्ट पार्क, सांस्कृतिक केंद्र, सायन्स पार्क, स्नोपार्क, व्हीव्हींग गॅलरी, एक्झिबिशन सेंटर, अध्यात्मिक सुविधा केंद्र इत्यादींसह इतर महत्त्वाच्या बाबींचादेखील समावेश करण्यात येणार आहे. पालिकेने या सुधारित विकास आराखड्यासंदर्भात मागवलेल्या सूचना व हरकतीत घोडबंदर, कळवा भागातील नागरिकांनी रस्ता रुंदीकरणाला विरोध केला आहे. नौपाड्यातील नागरिकांना रस्ता रुंदीकरण हवे असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. आतापर्यंत ७हजार ५०० हून अधिक हरकती व सूचना प्राप्त झाल्याची माहिती पालिकेने दिली आहे. ठाणे महापलिकेच्या माध्यमातून गुरुवार, १३ फेब्रुवारीपासून ठाणेकरांकडून नोंदविण्यात आलेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी घेण्यास सुरुवात होईल, असे उपसंचालक कुणाल मुळे यांनी सांगितले.

# धसई भात खरेदी केंद्राबाबत शेतकऱ्यांचे निवेदन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ उपप्रादेशिक कार्यालय शहापूर अंतर्गत मुरबाड तालुक्यातील आदिवासी विभागात असलेले धसई भात खरेदी केंद्रातील अडचणींचे निवेदन धसई व टोकावडे विभागातील सुभाष पवार यांचे समर्थक यांनी आदिवासी विकास महामंडळाच्या प्रतिनिधींना देण्यात आले.
- धसई भात केंद्रावर महामंडळाने फक्त एकच कर्मचारी नियुक्त केला आहे त्यामध्ये वाढ करावी, प्रादेशिक कार्यालयाच्या सुचनेनुसार दिवसाला फक्त ४०० क्विंटल भात घ्यावे त्यामध्ये प्रती दिन १५०० क्विंटल भात खरेदीला परवानगी मिळावी,
- भात खरेदी केंद्रावर महामंडळाने शेतकऱ्यांचे भात घेतल्यावर तात्काळ पावतीचे ऑनलाईन करून शेतकऱ्यांच्या बँक खात्यात भाताची रक्कम तात्काळ मिळावी,माळ (२२०० शेतकरी) धसई (९२९ शेतकरी) केंद्रावर मोठ्याप्रमाणात शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून ३१ मार्च मुदत पूर्वी काही शेतकऱ्यांची भात खरेदी राहिल्यास आदिवासी महामंडळाने जबादारी घ्यावी अशा मागण्यांचे निवेदन देण्यात आले.
- याप्रसंगी मुरबाड तालुका शेतकरी सहकारी संघाचे माजी चेअरमन प्रकाश पवार, ठाणे जिल्हा परिषदचे माजी सदस्य संजय पवार, शेतकरी सहकारी संघ मुरबाडचे माजी संचालक संतोष देसले, सुभाष भोईर, साईबाबा ट्रस्टचे अध्यक्ष कैलास घोलप, शेतकऱ्यांचे प्रतिनिधी भास्कर पवार, कांताराम बोंबे, मंगल देसले, धनाजी सुरोशे, शिवाजी सुरोशे, कृष्ण पादिर, दीपक सुरोशे, विष्णू पवार आदि उपस्थित होते.

# सरकार उभारणार 'उमेद मॉल'

## २५ लाख 'लखपती दीदी' करण्याचे उद्दिष्ट - मुख्यमंत्री फडणवीस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /मुंबई : राज्यभरातील बचत गटांना हक्काचे विक्रीचे साधन उपलब्ध व्हावे यासाठी प्रायोगिक तत्त्वावर दहा जिल्ह्यांत टप्प्याटप्प्याने 'उमेद मॉल' तयार करणार आहोत. राज्यात आगामी कालावधीत एक कोटी 'लखपती दीदी' करण्याचा संकल्प आहे. सध्या राज्यात १८ लाख 'लखपती दीदी' असून, मार्चपर्यंत त्यांची संख्या पंचवीस लाख करणार आहोत, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

१ ६० लाखांपेक्षा अधिक कुटुंबांची आर्थिक प्रगती बांद्रा-कुर्ला संकुल येथे ग्रामविकास विभागाच्या महालक्ष्मी सरस • प्रदर्शनाच्या उदघाटनप्रसंगी मंगळवारी ते बोलत होते. यावेळी ग्रामविकास व पंचायतराजमंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री योगेश कदम, विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, 'उमेद'चे मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश सागर, मुख्य परिचालन अधिकारी परमेश्वर राऊत यांच्यासह राज्यभरातून बचत गटांच्या महिला या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. हे प्रदर्शन २३ फेब्रुवारीपर्यंत सुरू राहणार आहे.

२ फडणवीस म्हणाले, की 'उमेद' अभियानाच्या प्रगतीचा मी स्वतः २ साक्षीदार आहे. 'उमेद'च्या माध्यमातून महालक्ष्मी सरस हा गेली २१ वर्षे अविरत सुरू असलेला महिला बचत गटांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणारा उपक्रम झाला आहे. 'उमेद'च्या माध्यमातून ६० लाखांपेक्षा अधिक कुटुंब आर्थिक प्रगती करत आहेत, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

# मध्यम प्रदूषित हवेने ठाणेकर त्रस्त

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे महापालिका हद्दीत मागील सात दिवसांत हवेचा गुणवत्ता निर्देशांक सरासरी १०१ इतका आढळला आहे. सध्या ठाणे शहराची हवा मध्यम प्रदूषित गटात आहे. यापूर्वी २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत हवेचा गुणवत्ता निर्देशांक ८७नोंदवला गेला होता. पण मागील आठवड्यात हवेतील गुणवत्ता निर्देशांकात किरकोळ वाढ झाल्याचे दिसून येत आहे. ठाणे महापालिका हद्दीत हवेचा सरासरी गुणवत्ता निर्देशांक सोमवारी ३ फेब्रुवारी रोजी १०० एवढा आढळला होता, तर ४ फेब्रुवारी ९३, ५ फेब्रुवारी ७६, ६ फेब्रुवारी ९६, ७ फेब्रुवारी १०६, ८ फेब्रुवारी १२३ आणि ९ फेब्रुवारी ११७असा सरासरी हवेचा गुणवत्ता निर्देशांक आढळून आला.

# आदिवासी विद्यार्थ्यांसाठी संगणक साक्षरता अभियान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई - जॉय ऑफ गिव्हिंग सामाजिक संस्था व आयके अर फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी 'संगणक साक्षरता उपक्रम' राबविण्यात येत आहे. याची सुरुवात नुकतीच पनवेलच्या वनवासी कल्याण आश्रमातून करण्यात आली, या वसतिगृहात एकूण ४० विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यांना संगणकाचे ज्ञान मिळावे, या हेतूने जॉय व आयकेअरच्या वतीने संगणक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यावेळी जॉयचे नवी मुंबई समन्वयक वैभव पाटील व आश्रमाचे केंद्रप्रमुख राजेंद्र शिंदे उपस्थित होते. या संगणकांचा चांगला उपयोग मुलांना होणार असून, त्यांना संगणकीय ज्ञानाचा सराव होण्यासाठी वापर होणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

# भिवंडीत भंगार गोदामाला आग

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : मुंबई-नाशिक महामार्गावरील भिवंडीजवळील सोनाळे गाव परिसरातील रस्त्यावर असलेल्या एका भंगार मालाची साठवणूक केलेल्या गोदामाला सोमवारी दुपारी २ वाजताच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीमध्ये संपूर्ण गोदाम जळून खाक झाले असून, गोदामाजवळ उभा असलेला टेम्पोही आगीच्या भक्षस्थानी पडला आहे. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन २ तासांत या आगीवर नियंत्रण मिळविले. सदर आग ही नेमकी कशामुळे लागली याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. या आगीत संपूर्ण गोदाम जळून खाक झाले आहे.

# ठाकुर्ली उड्डाणपूल विस्तारातील विघ्ने दूर

## संतवाडी झोपडपट्टीतील ६० बाधितांना बीएसयूपीतून मिळाली घरे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली: ९० फुटी रोडला जोडण्यात येणाऱ्या विस्तारित ठाकुली रेल्वे उड्डाण पुलाच्या कामाने बाधित होत असलेल्या संतवाडी झोपडपट्टीमधील ६० रहिवाशांना खंबाळपाडा भोईरवाडीमधील केंद्र, राज्य सरकारच्या निधीतून उभारलेल्या बीएसयूपी योजानेतील घरे देण्याचा निर्णय कल्याण डोंबिवली महापालिकेने यापूर्वीच घेतला आहे. अस्खेर संतवाडीमधील ६० रहिवाशांना सोडत पद्धतीने खंबाळपाडा भोईरवाडीतील ६० घरांचा ताबा पत्रे पालिकेकडून देण्यात आली. त्यामुळे रखडलेल्या ठाकुली उड्डाणपूल विस्तारीकरण कामातील मोठा अडथळा दूर झाला आहे. स. वा. जोशी शाब्य येथे ठाकुली रेल्वे उड्डाणपूल उभारण्याचा निर्णय कल्याण-डोंबिवली महापालिकेने १० वर्षापूर्वीच घेतला होता. त्यानुसार तीन वर्षापूर्वी स. वा. जोशी शाळेजवळ पूर्व-पश्चिमेला जोडणारा उड्डाणपूल बांधून तो वाहतुकीसाठी सुरू करण्यात आला. याच उड्डाणपूलाची एक मार्गिका ठाकुर्लो रेल्वे स्टेशनमार्गे ९० फुटी रस्त्यावरील मासोबा चौकापर्यंत नेण्याचा निर्णयदेखील त्याचवेळी घेण्यात आला होता. मात्र, उड्डाणपूल उभारण्यासाठी लागणारा निधी आणि या मार्गिकेमधील संतवाडी झोपडपट्टी सर्वांत मोठा अडथळा ठरत होती. स. वा. जोशी शाळा ते महासोवा चौकादरम्यान उड्डाणपूल उभारणीचे काम एमएमआरडीएमार्फत करण्यात येणार आहे. पुलामुळे ठाकुर्लो पूर्व रेल्वे स्थानकाजवळील संतवाडीमधील ६० कुटुंबे आणि लगतच्या म्हसोचा नगर झोपडपट्टीतील २८ कुटुंबे बाधित झाली. या ८८ कुटुंबीयांचे योग्य जागेत पुनर्वसन होत नाही, तोपर्यंत आम्ही आमच्या घरांचा ताबा देणार नाही, अशी भूमिका रहिवाशांनी घेतली होती. दरम्यानच्या काळात महसोबानगरमधील झोपडपट्टीचा 5 of 8 टीडीआर एका विकासकाने आपल्या गृहसंकुलासाठी वापरला. त्यामुळे म्हसोबानगर झोपडपट्टीतील २८ कुटुंबीयांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी त्या विकासकावर आली आहे. बाधितांच्या घरासाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, शहर प्रमुख व आमदार राजेश मोरे यांनी पाठपुरावा केला. ठाकुर्ली उड्डाणपूल ते म्हसोबानगर चौकापर्यंतचे काम, निधी आणि इतर तांत्रिक कारणांमुळे मागील सहा वर्षांपासून रखडले होते. आता ठाकुली पूलबाधित संतवाडीतील ६० रहिवाशांना सोडत पद्धतीने घरांची ताबा पत्रे देण्याची प्रक्रिया पार पडली. मासोवानगरमधील २८ रहिवाशांच्या पुनर्वसनाबाबत नगररचना विभाग आणि विकासकाने सामंजस्याने योग्य निर्णय घेतला की या उड्डाणपुलाच्या विस्तारीकरणाच्या कामातील सर्वच अडथळे दूर होऊन मार्ग मोकळा होणार आहे.

# रेल्वे प्रवाशांचे सामान चोरणाऱ्यांना अटक



पालघर लोह पोलीसांची उल्लेखनिय कामगिरी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : पालघर लोहमार्ग पोलीस ठाणे लोहमार्ग मुंबई पोलीस आयुक्तालय यांची उल्लेखनिय कामगिरी रेल्वे प्रवासी यांच्या बॅगमधुन सोन्याचे दागीने तसेच मोबाईल फोन चोरी करणा-या आरोपीस अटक करुन गुन्हे उघडकीस आणले. पालघर रेल्वे पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेवुन त्यांच्याजवळ असलेली बॅगेची चैन खोलुन, मोबाईल फोन, दागीने इत्यादी मौल्यवान वस्तु चोरत असलेल्या आरोपींवर पाळत ठेवुन वारंवार घडत असलेल्या गुन्ह्यांच्या अनुषंगाने, गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस अंमलदार यांनी वेळोवेळी विविध रेल्वे स्टेशनवर नागरी वेषात सापळा लावुन दोन आरोपी दिपक उर्फ विश्वास उध्दव काळे वय 37 वर्ष व उमेश बाळा काळे वय 22 वर्ष यांना रंगेहात पकडुन त्यांचेकडे सखोल तपास केला असता, पालघर रेल्वे पोलीस स्टेशन हद्दीत घडलेल्या एकुण 05 गुन्ह्यांची उकल करुन रु. 1,041,720/- किंमतीचे चोरीस गेलेले दागीने व रु. 73,188/- किंमतीचे चोरीस गेलेले मोबाईल फोन असे एकुण रु. 11,14,908/- रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. ही उलेखनिय कामगिरी डॉ.रविंद्र शिसवे, पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई. मनोज पाटील, पोलीस उप-आयुक्त, पश्चिम परिमंडळ लोहमार्ग मुंबई. ज्ञानेश्वर गणोरे, सहायक पोलीस आयुक्त, वसई विभाग, लोहमार्ग मुंबई यांचे आदेशाप्रमाणे सचिन इंगवले वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पालघर रेल्वे पोलीस ठाणे, दामाजी हराळे यांचे • मार्गदर्शनाखाली पोहवा 2115 राहुल रा. भोईटे, पोहवा 337 डी. यु. शिंदे, पोहवा 1384 एम.डी.पाटील, पोना /2343 व्ही. व्ही. गोळे, पोशि 3434 जी.ए. कांबळे, पोशि 1479 अहिरे, पोशि/ 540 नागणे यांनी केली आहे.

## मुरबाड पंचायत समितीच्या वतीने

# ग्राम स्वराज्य अभियानाचे प्रशिक्षण



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : महाराष्ट्र शासन व यशदा पुणे प्रस्तावित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान पंचायत राज प्रशिक्षण केंद्र कोसबाड हिल व जिल्हा परिषद ठाणे पंचायत समिती मुरबाड येथे १२ फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारी २०२५या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे.

प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन पत्रकार बाळासाहेब भालेराव यांचे अधक्षतेखाली करण्यात आले. प्रशिक्षण वर्गाचे प्रास्तविक पंचायत राज प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य ॲड.प्रदिप चौधरी यांनी केले. उद्घाटन प्रसंगी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी (ग्रा.पं.) लक्ष्मण सूरोसे, सेवालाल राठोड , प्रल्हाद लोकडे आणि प्रवीण प्रशिक्षक नारायण देसले उपस्थित होते. प्रशिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, ते घेणे सदस्यांचे दृष्टीने खुप महत्वाचे आहे. असे मत अध्यक्षीय भाषणात बाळासाहेब भालेराव यांनी सांगितले. प्रशिक्षण वर्गामध्ये महाराष्ट्र ग्राम पंचायत कायदा १९५९ च्या विविध कलमांची माहिती देण्यात आली. जसे - ग्राम पंचायत इतिहास, ७३ वी घटना दुरुस्ती व त्यानंतर झालेले बदल, मासिक सभा,वर्डसभा,ग्रामसभा व महिला सभा, ग्राम पंचायत अंदाज पत्रक,सदस्य अपत्रता, अधिकार कर्तव्य व जबाबदाऱ्या, आमचा गाव आमचा विकास, शस्वत विकासाचे १७ ध्येय व केंद्र शासनाच्या नऊ संकल्पना. इत्यादी विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे, तरी जास्तीत जास्त ग्राम पंचायत सदस्य यांनी उपस्थित राहावे असे आव्हान लक्ष्मण सुरोसे वि. अ.(ग्रा.पं.)यांनी केले.तर तीन दिवस चालणाऱ्या प्रशिक्षणास तालुक्यातील सर्व सरपंच, उपसरपंच तसेच सर्व सदस्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य ॲड.प्रदीप चौधरी यांनी केले आहे.

## 'एक पांघरूण मायेचे'

# पालघर शहरात मोफत ब्लँकेट वाटप

पालघर : नेहमीच शैक्षणिक- सामाजिक - आरोग्य सेवा व संस्कृतीक शेत्रातील तरूण वर्गाला प्रोत्साहन देण्यासाठी व सर्वसामान्य जनतेला मदत करण्यासाठी सतत प्रयत्नशील असलेले. केदार काळे अध्यक्ष पालघर संस्कृतिक मित्र मंडळ यांच्या पुढाकाराने व डॉ. राजेंद्र चव्हाण ( स्रिरोग तज्ञ ) तथा समाज सेवक पालघर यांच्या मदतीने आणि सहकार्याने, पालघर शहरातील वेगवेगळया विभागात शेकडो कुटुंबियांना मोफत ब्लँकेट वाटप करण्यात आली आहेत. तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत शैक्षणिक साहित्य वाटप, मेडिकल कॅम्प आरोग्य तपासणी शिबिरे आदी कार्यक्रम नेहमीच राबविण्यात येत आहेत.

दिनांक 11 फेब्रुवारी 2025 रोजी पालघर पूर्व येथील वीरेंद्र नगर नर्सरी भाग, हनुमान मंदिराच्या जवळ पालघर, येथे केदार काळे यांच्या पुढाकाराने व पालघर चे स्त्री रोग तज्ञ व समाजसेवक डॉक्टर राजेंद्र चव्हाण यांच्या मदतीने व सहकार्याने या भागातील १०० पेक्षा जास्त कुटुंबांना ब्लँकेट वाटप करण्यात आले. त्यावेळी संजय धोत्रे समाजसेवक व इतर कार्यकर्ते उपस्थित होते. पालघर शहरात व पालघर जिल्ह्यात ब्लँकेट वाटपाचा कार्यक्रम विविध भागात सुरूच आहे. यापुढेही सुरू राहणार आहे. असे आयोजकांकडून सांगितले जात आहे.



'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024